पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय

## सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.९ )

दिनांक : ०३/०१/२०२० वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे जानेवारी २०२० ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०३/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.बुर्डे सुवर्णा विकास | - | **अध्यक्षा** |
| २) मा. निर्मला गायकवाड | - | सदस्या |
| ३) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी | - | सदस्य |
| ४) मा.गोफणे अनुराधा देविदास | - | सदस्या |
| ५) मा.बारसे प्रियांका प्रविण | - | सदस्या |
| ६) मा.अजित दामोदर गव्हाणे | - | सदस्य |
| ७) मा.फुगे भिमाबाई पोपट | - | सदस्या |
| ८) मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | - | सदस्य |
| ९) मा.लांडे विजय नामदेव | - | स्विकृत सदस्य |

या शिवाय मा.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.राजेंद्र शिंदे-उपअभियंता स्थापत्य, श्री.विजय जाधव-उपअभियंता स्थापत्य/उद्यान, श्री.वहीकर एस.एस. उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, श्रीमती प्रेरणा शिनकर, उपअभियंता, स्थापत्य, श्री.वि.की.वाईकर,उपअभियंता,जलनिसारण विभाग, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.एस.व्ही.बगाडे-सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.व्ही.एम.ताकवले -क.अभियंता (स्थापत्य.), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.ए.व्ही.गुमास्ते-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.निखील फेंडर-क.अ. स्था.उद्यान, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांचे जयंती निमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन, सौ.सुवर्णा बुर्डे, सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

तदनंतर मा.सभापती सौ.सुवर्णा बुर्डे यांनी मागील कार्यपत्रिका क्रमांक ०८ दिनांक १०/१२/२०१९ रोजीचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे जाहिर केले.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्रमांक १ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ च-होली येथील स.नं.२२८ मधील विकास आराखडयातील १८.०० मी.डी.पी.रस्ता स्थलांतरीत करणेबाबत

विषय क्रमांक २ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३चोविसावाडी स.नं.१५५/५ए येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील पिनाकी कॉलनी येथील नामकरणाबाबत .

विषय क्रमांक ३ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील मौजे – च-होली ता.हवेली येथील स.नं.१०९/२/३, ११५/१, ११६/२, १२२/२ मधून पाझर तलावात ३०.०० मी. डी.पी.रस्ता करणेबाबत .

विषय क्रमांक ४ मा.लक्ष्मण सोपान सस्ते यांचा प्रस्ताव
मौजे-च-होली येथील स.नं.१६३, १६४, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७ नाल्याच्या कडेने (दक्षिण – उत्तर) मधील १२.०० मी. रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम २०१३ कलम २०५ अन्वये घोषीत करणेबाबत

विषय क्रमांक ५- मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
मौजे भोसरी येथील पुणे नाशिक रस्ता (लांडगेवस्ती ) व पुणे आळंदी(वाळकेमळा) रस्ता भोसरी सर्व्हे नं.१३७ , १३८,१३९,१४०,१७०,१७१,१७२,१८३,व १८६ मधुन जाणारा ४० फुट रुंद व सुमारे २ कि. मी लांब रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ अन्वये घोषीत करणे बाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३५ | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | ०३/०१/२०२० | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : | मा.फुगे भिमाबाई पोपट | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०३/०१/२०२० रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे च-होली येथील सर्व्हे क्रमांक २२८ मधील विकास आराखडयातील १८.०० मी. डी.पी. रस्ता प्रस्तावित आहे. तथापि रस्ता सर्व्हे क्रमांक २२८ च्या मधून जात असून, सदर रस्त्यामुळे नाल्याकडील उर्वरित क्षेत्र नॉन बिलटेबल रहात असलेने सदरचा रस्ता नाल्याकडील बाजूस स्थलांतरीत करणेची आवश्यकता आहे. सदर सर्व्हे क्रमांक २२८ मधील जागा मालक सदर रस्ता स्थलांतरीत करणेस तयार आहेत. त्यामुळे सदरचा रस्ता नाल्याचा बाजूस स्थलांतरीत करणेचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

ठराव क्रमांक : ३६ विषय क्रमांक : ०२
दिनांक : ०३/०१/२०२० विभाग : स्थापत्य
सुचक : मा. निर्मला गायकवाड अनुमोदक : मा. फुगे भिमाबाई पोपट

संदर्भ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०३/०१/२०२० रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

चोविसावाडी म.नं.१५५/५ए येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील पिनाकी कॉलनीस "श्रीराम कॉलनी" असे नामकरण करणेबाबत नागरीकांची मागणी असून त्यानुसार पिनाकी कॉलनीस "श्रीराम कॉलनी" असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

ठराव क्रमांक : ३७ विषय क्रमांक : ०३
दिनांक : ०३/०१/२०२० विभाग : नगररचना
सुचक : मा. फुगे भिमाबाई पोपट अनुमोदक : मा. निर्मला गायकवाड

संदर्भ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०३/०१/२०२० रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

पिंपरी चिंचवड मनपा हददीतील मौजे-च-होली ता.हवेली ता.हवेली येथील स.नं.१०९/२/३, ११५/१, ११६/२, १२२/२ ) येथे पाझर तलाव हददीतून ३० मी. डी.पी. रस्ता जात असून, सदर रस्त्याचे काम करणेची मागणी स्थानिक शेतकरी व नागरीक करीत आहेत. सदरच्या रस्त्यामुळे च-होली व लोहगांव रहदारीस फायदा होणार आहे. त्यामुळे मनपा हददीतील पाझर तलावातून नियोजित ३० मी. रस्त्यामध्ये पाझर तलावाचे विभाजन होत असल्याने आवश्यक ते १२०० एम.एम. व्यासाचे आर.सी.सी.पाईप टाकून त्यावर भराव करुन खालील पाण्याला अडथळा होणार नाही. तरी सदर रस्ता करणेस परवानगी मिळणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

ठराव क्रमांक : ३८ विषय क्रमांक : ०४
दिनांक : ०३/०१/२०२० विभाग : नगर रचना
सुचक : मा. निर्मला गायकवाड अनुमोदक : मा. फुगे भिमाबाई पोपट

संदर्भ मा. लक्ष्मण सोपान सस्ते यांचे दिनांक ०३/०१/२०२० रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे – च-होली येथील सर्व्हे क्र.१६३ येथे २४ मी. डी.पी.रस्ता असून सदर रस्त्यावरुन वस्तीकडे जाण्याकरीता रस्ता म.नं.१७७ मध्ये ३० मी. रस्ता असून, दोन्ही रस्त्याच्यामधील लोकवस्तीचा भाग जोडणेकरीता सदर ठिकाणी १२.०० मी. रस्त्याची आवश्यकता आहे. त्यामुळे तेथील नागरीकांच व शेतक-यांची वाहतुकीची सोय होणार आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ अन्वये मौजे च-होली येथील स.नं.१६३, १६४, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७ नाल्याच्या कडेने ( दक्षिण – उत्त) मधील १२.०० मी रस्ता घोषित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३९ | विषय क्रमांक | : | ०५ |
| दिनांक | : | ०३/०१/२०२० | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : | मा. फुगे भिमाबाई पोपट | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ    मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०३/०१/२०२० रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे – भोसरी येथील सर्व्हे क्र. १३७, १३८, १३९, १४०, १७०, १७१, १७२, १८३ व १८६ मधुन ४० मी. रुंद व २ की. मी लांब रस्ता पुणे नाशिक रस्ता (लांडगेवस्ती ) व पुणे आळंदी(वाळकेमळा)रस्ता भोसरी रस्त्याने जोडला आहे. सदर रस्त्यावरुन सद्यस्थितीत वाढत्या रहदारी मुळ जाण्याकरीता अपुरा पडत असल्याने वारंवार होत असलेली वाहतुक कोंडी टाळण्या करीता नव्याने तयार करणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ अन्वये मौजे – भोसरी येथील स.नं.१३७, १३८, १३९, १४०, १७०, १७१, १७२, १८३ व १८६ मधुन ४० मी. रुंद व २ की. मी लांब रस्ता रस्ता घोषित करणे कामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करुन मा.अध्यक्षा,यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ ०४/कावि/ ४२ /२०२०
दिनांक : २९ /०१ /२०२०

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२-/सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.